# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरात विविध ठिकाणी एकुण ५५० बॅनर स्टॅन्डवर
**{आकाशचिन्ह परवाना विभाग}** जाहिरात करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या मे M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची रु. १,४०,००,०००/- ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**संक्षिप्त टिपणी:-**

१. सादर करण्यात येते की, नागपूर शहरात विविध ठिकाणी एकुण ५५० बॅनर स्टॅन्डवर जाहिरात करण्याचे अधिकार देण्यासंबंधात खालील प्रमाणे अनेकदा निविदा बोलविण्यात आल्या.

| अ.क्र. | निविदा क्र. / Tender ID | निविदेची वेळ | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|---|
| १ | २३८/पी.आर, दि. ०८.१०.२०२१/ २०२१_NMCN_७२७६३२_१ | प्रथम (First Call) | निरंक |
| २ | क्र. ३२६/पी.आर, दि. ०८.११.२०२१/ २०२१_NMCN_७३६९५०_१ | दुसरा (२nd Call) | निरंक |
| ३ | क्र. ३४७/पी.आर, दि. १६.१२.२०२१/ २०२१_NMCN_७४७८२७_१ | तीस-यांदा (३rd Call) | निरंक |
| ४ | क्र. ५०२/पी.आर, दि. ११.०२.२०२२/ २०२२_NMCN_७६८३४०_०४ | चौथ्यांदा (४th Call) | निरंक |
| | निविदेत प्रतिसाद न मिळाल्यामुळे निविदा प्रपत्रातील Evaluation Criteria मधील काहि अटी मा. आयुक्त यांचे दिनांक १३.०६.२०२२ रोजी चे मान्यते उपरांत शिथील केल्यानंतर बोलविण्यात आलेल्या निविदा. | | |
| ५ | क्र. ८७/पी.आर, दि. २२.०६.२०२२/ २०२२_NMCN_८११०५५_१ | प्रथम (First Call) | एक |
| ६ | क्र. १७०/पी.आर, दि. १०.०८.२०२२/ ID, २०२२_NMCN_८२६५९२_१ | दुसरा (२nd Call) | एक |

२. वरील प्रामणे निविदा अनेकदा बोलविण्यात आल्यानंतर काही प्रतीसाद मिळत नसल्यामुळे नविदेतील काहि अटी शिथील केल्यानंतर प्रथम निविदा बोलविण्यात आली. त्यामध्ये एकच निविदा प्राप्त झाली. परंतु मूळ प्रारूप निविदेमध्ये बदल केल्यास त्यास प्रथम निविदा समजण्यात येवून दुस-यांदा (२nd Call) बोलविण्यात आलेल्या निविदे मध्ये एकमात्र निविदाकार M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची आधाभुत किंमत (Offset Price) रु. १,३८,००,०००/- च्या तुलनेत जास्ती म्हणजे रु. १,४०,००,०००/- ची निविदा प्राप्त झालेली आहे.

३. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दिनांक २७.०९.२०१८ मधील पृष्ठ क्र. १६ अनुक्रमांक ४.३ चे कृपया अवलोकण व्हावे. उक्त शासन निर्ययामध्ये मुळ प्रारूप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदाबाबत निविदा उघडुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करावी. अशा निविदेबाबत पुन:श्च फेरनिविदा मागविण्याची आवश्यकता नाही असे नमुद आहे. तसेच वारंवार निविदा बोलवून प्रतिसाद न

मिळाल्यामुळे महसुल प्राप्त होत नव्हता त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेता M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची रु. १,४०,००,०००/- ची निविदेस मंजूरी प्रदान करण्यास विभागाची शिफारस आहे.

सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 97/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 16/09/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), आकाशचिन्ह परवाना विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात विविध ठिकाणी एकुण ५५० बॅनर स्टॅन्डवर जाहिरात करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या मे M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची रु. १,४०,००,०००/- ची निविदा मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**